# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३**

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १२**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३०, कामगार, सेवायोजन व कौशल्य विकास**<br>**बाब क्रमांक: २२६, रूपये:- ८३,८२,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१) | ६२०६ | १० | राज्यातील सिमेंट उद्योग व सिमेंटवर आधारित उद्योग यातील कामगारांना समान किमान वेतन लागू करण्यात आले असूनही सिमेंट उद्योगात काम करणाऱ्या कामगारांना सध्या अल्प वेतन मिळत असल्याने किमान वेतन यादीमध्ये दुरुस्ती करुन सिमेंट उद्योगातील कामगारांना किमान वेतन देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी, विजयक्रांती संघटने द्वारे मागील काही वर्षापासून करण्यात येत असणे, याबाबत माहे जुलै व नोव्हेंबर २०२१ मध्ये तत्कालिन कामगार मंत्री यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत कोणत्याही परिस्थितीत योग्य किमान वेतन मिळणे आवश्यक असून सिमेंट उद्योगातील ठेका श्रमिकांबाबत किमान वेतन समितीसमोर वेतनवाढीबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करुन किमान वेतन देण्याबाबतचा निर्णय होऊनही तत्कालिन प्रधान सचिव-कामगार विभाग, तत्कालिन कामगार आयुक्त यांना सिमेंट उद्योग व सिमेंटवर आधारित उद्योगातील कामगारांना किमान समान वेतन लागू करण्यांबाबत प्रस्ताव करुन तातडीने कार्यवाही करण्याबाबत तत्कालिन कामगार मंत्री यांनी निर्देश देऊनही माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये झालेल्या बैठकीतील प्रस्तावास दोन वर्षांचा विलंब करुन माहे मे, २०२२ मध्ये प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविला असून दीड वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही कामगार विभागाने यावर कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याने तातडीने सिमेंट उद्योग व सिमेंटवर आधारित उद्योगातील कामगारांना समान किमान वेतन लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३०, कामगार, सेवायोजन व कौशल्य विकास**<br>**बाब क्रमांक: २२९, रूपये:- ५,००,००,०००/-**<br>**श्री. बाळासाहेब थोरात** |
| (२) | ६१९३ | १०० | असंघटित कामगार कल्याण महामंडळ व त्याअंतर्गत उद्योग व्यवसाय क्षेत्रनिहाय ३९ आभासी महामंडळे स्थापन करण्याकरिता ५ कोटी इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली असणे, सेंचुरी रेयॉन (शहाड, जि. ठाणे) कंपनीत टँकरच्या स्फोटात ६ कामगारांचा झालेला मृत्यू, शहाड (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सेंचुरी रेयॉन कंपनीत टँकर मालकाच्या हलगर्जीपणामुळे स्फोटक गॅस भरताना झालेल्या स्फोटात ६ जणांचा मृत्यू होऊन ४ जण जखमी झाल्याची घटना सप्टेंबर, २०२३ वा त्यासुमारास घडणे, सदर स्फोट घडण्याचे नेमके कारण शोधण्यात पोलिसांना यश आले काय, तसेच याप्रकरणी उल्हासनगर पोलिसांनी चौकशी केलेली असल्यास त्यात आढळून आलेल्या दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली असणे, उक्त स्फोटात मृत्युमुखी पडलेल्या व जखमी झालेल्या कामगारांना व त्यांच्या कुटुंबीयांना मदत मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८०१, वीज**<br>**बाब क्रमांक: २३०, रूपये:- १८,०१,८०,००,०००/-**<br>**श्री. विश्वजित कदम** |
| (३) | ६२०८ | १० | सांगली जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या शेतीसाठी वीज पुरवठा पूर्ण क्षमतेने होत नसून त्यामुळे शेतीचे पाणी असून सुद्धा वीज पूर्ण क्षमतेने मिळत नसलेने प्रचंड नुकसान होत नसणे, यासाठी ट्रान्सफार्मरची कमतरता व दुरुस्तीसाठी लागणारा विलंब होत असणे, सांगली जिल्ह्यात साधारण सद्यस्थितीला १ हजार नविन अतिरिक्त ट्रान्सफार्मरची आवश्यकता असणे, तसेच ट्रान्सफार्मर दुरुस्तीसाठी एजन्सीला महावितरण मार्फत केला जाणारा ऑईलचा पुरवठा वेळेत होत नसलेने व तुटवढा भासत असलेने दुरुस्तीसाठी लागणारा कालावधी जास्त जात असून त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. कुणाल पाटील** |
| (४) | ६२०७ | १० | धुळे तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी शेतीपंपासाठी विद्युत कनेक्शन मिळवण्यासाठी पैसे भरलेले आहेत. तरी अद्यापपावेतो विद्युत कनेक्शन देण्यात आलेले नाहीत. वीज पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी शेतकऱ्यांकडून सिंगल फेज ट्रान्सफार्मरची मागणी करण्यात आलेली आहे. नवीन ५०० ट्रान्सफॉर्मर ची मागणी करण्यात आलेली असून नवीन वस्त्यांमध्ये व आदिवासी वस्तीत इलेक्ट्रिक पोलचे कामे प्रलंबित आहेत. शेतीपंपाचे नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर वेळेवर बदलून मिळत नसल्यामुळे ग्रामीण भागात इलेक्ट्रिक पोलच्या तारा नादुरुस्त आहेत. त्या बदलून नवीन पोल ची मागणी शेतकरी बांधवांकडून करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीणे नळ पाणीपुरवठा योजनेसाठी नवीन ट्रान्सफॉर्मरची मागणी केलेली असून वाढीव वीज बिलाबाबत ग्राहकांच्या अनेक तक्रारी आहेत. ग्रामीण भागात, शेतीशिवारात विद्युत तारा लोंबकळलेल्या अवस्थेत असल्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झालेला आहे. ग्रामीण भागातील सामान्य जनता व शेतकरी बांधवांच्या अनेक समस्या व विविध मागण्या असून या मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. तरी धुळे तालुक्यातील उर्जा विषयी समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी शासनाने जास्तीचा निधी तातडीने मंजूर करून उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (५) | ६२२१ | १० | वाळवा तालुक्यातील काही गावांमध्ये (साटपेवाडी, बोरगांव, गौंडवाडी) शेतकऱ्यांना फिडरवरील मिटर रिडींगप्रमाणे ॲव्हरेज बीले (इंडेक्स बिलींग पध्दतीने) दिली जात असणे, त्यामुळे छोटया शेतकऱ्यांना जादा वीज बीले येत असणे, तरी मिटर असणाऱ्या शेतकऱ्यांची मिटर रिंडींगप्रमाणे वीज आकारणी करणे,. तसेच ज्यांचे मिटर नाहीत त्यांची हॉर्स पॉवरप्रमाणे योग्य आकारणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (६) | ६२०० | १० | जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना कृषिपंपासाठी वीज जोडणी देण्यात येत असणे, परंतु सदर वीज जोडणी देत असताना यात केवळ १० पोल पर्यन्त वीज जोडणी देण्याची अट असणे, यामुळे ज्या शेतकऱ्यांना कृषीपंप वीज जोडणीकरिता १० पोलपेक्षा अधिक पोलची आवश्यकता असल्याने सदर शेतकरी कृषी पंपाच्या वीज जोडणी पासून वंचीत राहत असणे , सदरची अट शिथिल करून प्रलंबित शेतकऱ्यांना तातडीने वीज जोडणी देण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५८२, उद्योग**<br>**बाब क्रमांक: २३१, रूपये:- ३०,००,००,००,०००/-**<br>**श्री. विश्वजित कदम** |
| (७) | ६२११ | १० | सांगली जिल्हयातील पलूस शहरातील औद्योगिक वसाहत (एमआयडीसी) मधील अंतर्गत रस्ते व पथदिवे यांची अवस्था अतिशय बिकट झाली असल्यामुळे तेथे सोयी सुविधा अपुऱ्या असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बाळासाहेब थोरात** |
| (८) | ६१८९ | १०० | एकत्रित प्रोत्साहन योजनेअंतर्गत लघु, मध्यम व मोठ्या उद्योग घटकांना व विशाल प्रकल्पांना विविध प्रोत्साहन रकमा देण्यासाठी ३००० कोटी इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले आहे. राज्यातील विविध ठिकाणी सुरु असलेले २६४४ उद्योग बंद असल्याबाबत राज्यातील विविध ठिकाणी एमआयडीसीकडे १६ लाख चौ.मीटर जागेवर उद्योग सुरु असणे, त्यातील तब्बल २६४४ उद्योग बंद असल्याची माहिती राज्य आर्थिक सल्लागार समितीच्या सादरीकरणातून नोव्हेंबर २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात उघडकीस येणे, हे उद्योग बंद होण्याची कारणे शोधण्याची गरज असून त्यांच्या पुनर्वसनासाठी “मित्रा” कडून शिफारशी करण्याचेही प्रतिपादन करणे, सदर समितीने एक ट्रिलीयन डॉलर्स अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ३४१ शिफारशी करणे, त्यानुसार राज्यातील १६ उद्योगांवर लक्ष केंद्रीत करताना २७ उत्पादन क्षेत्रातील संधीबाबतची माहिती समितीने अधोरेखित करणे, त्यात कॅपिटल गुड्स, अन्न प्रक्रिया, धातू आणि ऑटो क्षेत्रांचा समावेश असणे, वस्त्रोद्योगामध्ये कौशल्य स्तरावर रोजगार |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | वाढविताना महिला मनुष्यबळ वाढण्याची शिफारसही समितीकडून करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ६१९१ | १०० | एकत्रित प्रोत्साहन योजनेअंतर्गत लघु, मध्यम व मोठ्या उद्योग घटकांना व विशाल प्रकल्पांना विविध प्रोत्साहन रकमा देण्यासाठी ३००० कोटी इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले आहे. पंचतारांकित एमआयडीसीतील बाधित शेतकऱ्यांना विकसित भूखंड देण्यास होत असलेला अक्षम्य विलंब राज्यात उद्योग क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने ठिकठिकाणी पंचतारांकित एमआयडीसींची स्थापना करण्याचा घेतलेला निर्णय, सदर निर्णयाची अमलबजावणी करण्यासाठी राज्यातील शेतकऱ्यांची लाखो एकर जमीन संपादित करणे, या जमिनी ताब्यात घेऊन दहा ते बारा वर्षांचा कालावधी लोटणे, जमिनी ताब्यात घेताना प्रत्येक शेतकऱ्याच्या घरातील एका सदस्याला नोकरी आणि उद्योगधंदा करण्यासाठी १५ टक्के विकसित भूखंड देण्याचे आश्वासन देणे, उक्त निर्णयानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेंद्रा, बिडकीन भागात साकारलेल्या दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर प्रकल्पाच्या अनुषंगाने वस्तुस्थितीची जाणीव या भागातील झाल्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले भीतीचे व संतापाचे वातावरण, सन २००९ मध्ये सरकारने प्रकल्पग्रस्तांना १५ टक्के विकसित भूखंड देण्याचे मान्य केले असता आता या १५ टक्क्याऐवजी १० टक्केच देण्याबाबतचा निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांचे नाराजीचे वातावरण पसरणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१०) | ६२१४ | १० | भंडारा जिल्ह्यातील साकोली शहर हे नॅशनल हायवे लगत असून तालुक्यामध्ये MIDC (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) नसल्यामुळे येथील बेरोजगार युवकांचे रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात स्थालांतर बाहेर शहरात व राज्यात होत असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ६२१५ | १० | भंडारा जिल्ह्यात साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात उद्योग उभारणीसाठी स्वतंत्र MIDC उपलब्ध नसणे, त्यामुळे ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांचे शहराकडे पलायन होणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-११**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ६८०१, वीज प्रकल्पांसाठी कर्जे**<br>**बाब क्रमांक: २३६, रूपये:- १९,२५,१४,०००/-**<br>**श्री. बाळासाहेब थोरात** |
| (१२) | ६१९२ | १०० | के.एफ.डब्ल्यू. जर्मन बँकेकडून सौर उर्जा प्रकल्पासाठी मिळालेली कर्जाची रक्कम महानिर्मितीकडे हस्तांतरित करण्यासाठी रु. १९.२५ कोटीची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या महाजनको कंपनीला सौरउर्जा प्रकल्प उभा करण्यासाठी कंत्राटदार मिळत नसणे, उक्त निविदेला मुदतवाढ देण्याचा निर्णय महाजनकोने घेणे, राज्यात सध्याच्या परिस्थितीत महानिर्मिती कंपनीची स्थापित |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | उर्जा क्षमता 13 हजार मेगावॅट असून, त्यापैकी 9 हजार औष्णिक उर्जा आणि 4 हजार मेगावॅट जलविद्युतची क्षमता असणे. भविष्यात विजेची मागणी वाढत असल्यामुळे कोळशावरील उर्जेवरील अबलंबित्व कमी करण्यासाठी महानिर्मिती कंपनीने 600 मेगावॅट सौरऊर्जा प्रकल्प उभारणीचा निर्णय घेणे, सदर प्रकल्प राज्यभरात विविध ठिकाणी उभा करता येणार असून,त्यासाठी कंपनीने जाहीर निविदा काढली असता उक्त निविदेला प्रतिसाद न मिळणे, मूळ निविदेनुसार संबंधित कंत्राटदाराला पॅनेलवर आधारित सौरउर्जा निर्मिती प्रकल्पाची उभारणी करायची असून त्यासाठी प्रकल्पाशी आवश्यक आरेखन, अभियांत्रिकी, उत्पादन, पुरवठा निरीक्षण, उभारणी व चाचणीद्वारे अखेर हा प्रकल्प सुरु करुन तो ग्रीडला जोडायचा आहे. संबंधित कंत्राटदाराला किमान 50 मेगावॅट ते कमाल 300 मेगावॅटपर्यंत प्रकल्पाची उभारणी राज्यात कुठेही करता येईल. महानिर्मितीसाठी या प्रकल्पाची उभारणी करुन त्यानंतर ती महानिर्मितीला ग्रीडद्वारे पुरवायची आहे. 11 ऑक्टोबरपासून काढलेल्या या निविदेची अंतिम तारीख 31 ऑक्टोबर होती. आता तिला मुदतवाढ देण्यात येणे, महानिर्मिती कंपनीला त्यांची वीज केवळ राज्य सरकारी महावितरणला विक्री करण्याची परवानगी असणे, महावितरण मात्र महानिर्मितीखेरीज अन्य आठ ते दहा कंपन्यांकडून वीज खरेदी करीत असून महावितरणच्या एकूण विज वितरणात महानिर्मितीचा हिस्सा 35 ते 40 टक्के असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : ११ डिसेंबर, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर